महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे  Rs.2/-  कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖ १५ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २८७ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## भाजपाची सरनाईकांच्या मतदारसंघात मोर्चेबांधणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याचा आणि जिंकण्याचा इरादा भाजपच्या स्थानिक नेत्यांनी अनेकदा जाहीर बोलून दाखविला आहे. या इराद्याला आणखी बळ देण्याच्या अनुषंगाने इतर पक्षातील नाराज पदाधिकाऱ्यांचा या तीन नेत्यांच्या नेतृत्वात पक्षप्रवेश करून घेतला जात आहे.यातच आता घोडबंदर पट्टा मजबूत करण्यासाठी भाजपने एकेकाळी जायंट किलर ठरलेल्या शिवसेनेचे माजी नगरसेवक लॉरेन्स डिसोझा यांना आपल्या पक्षात घेतले आहे. रविवारी (13 एप्रिल) त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. लॉरेन्स डिसोझा यांच्या भाजप प्रवेशाचा थेट फटका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला बसण्याची शक्यता आहे. कोण आहेत लॉरेन्स डिसोझा? लॉरेन्स डिसोझा हे 2012 मध्ये ठाणे महापालिकेत शिवसेनेच्या तिकिटावर माजिवडा गाव परिसरातून निवडून आले होते. त्या वेळी राष्ट्रवादीचे उमेदवार देवराम भोईर यांचा त्यांनी पराभव केला होता. शिवसेनेतील बंडानंतरही डिसोझा यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नव्हती. त्यांनी लोकसभा निवडणुकीत राजन विचारे यांच्या प्रचाराची धुरा सांभाळली होती. पण आता माजिवडा प्रभागातील पॅनलमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भवितव्य संपुष्टात आल्याने त्यांना यंदा तिकीट मिळण्याची अपेक्षा मावळली होती. त्यामुळे भविष्याचा वेध घेत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे माजिवड्यात भाजपची ताकद वाढली आहे. त्यांच्यासोबत त्यांची कन्या स्टेफनी डिसोझा आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. लॉरेन्स डिसोझा यांना प्रवेश देत भाजपने ताकद वाढविलेला माजिवडा प्रभाग हा शिवेसना आमदार प्रताप सरनाईक यांचा बालेकिल्ला समजला जातो. शिवाय ओवळा-माजिवडा हा विधानसभा मतदारसंघ हा भाग ठाणे महानगरपालिकेपुरता सीमित नाही. ठाण्यातील लोकमान्यनगर, वर्तकनगर, शास्त्रीनगर, शिवाजीनगर वाघबीळ, कासारवडवली, माजिवडा, गायमुखपर्यंतचा भाग याच मतदारसंघांमध्ये येतो. त्याचवेळी मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विभागातल्या चेन्ना गाव, घोडबंदर गाव, वर्सोवा, काशिमिरा, गोल्डन नेक्स्ट, नवघर हे विभाग ओवळा-माजिवडा याच मतदारसंघात येतात. त्यामुळे डिसोझा यांना घेऊन भाजपने केवळ ठाण्यातील नाही तर मिरा भाईंदर महापालिकेच्या हद्दीत आपली ताकद वाढवल्याची चर्चा आहे. यातूनच सरनाईक यांच्यापुढेही आव्हान उभे राहिले आहे.

## 'गुरु स्वत:साठी न लढता समाजासाठी लढतो'

### हा आदर्श येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचविणार



**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोणताही गुरु स्वत:साठी न लढता समाजासाठी लढतो, हा आदर्श त्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे . हा आदर्श पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गुरमत समागम कार्यक्रम, एनएमएमसी मैदान, गुरुद्वाराजवळ नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात केले. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा ताई म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, संजीव नाईक, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता पक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त कैलास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुरुमत समागम कार्यक्रमात गुरुजींचा आशीर्वाद घेण्यासाठी उपस्थित राहता आले, हे माझे सौभाग्य आहे. आपण सर्वजण गुरुजींचा आशीर्वाद घेतो.

गुरु ग्रंथ साहेब यांच्या माध्यमातून जे विचार आपल्यापर्यंत पोहोचतात ते केवळ शीख समुदायाच्या कल्याणासाठी नसून समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी आहेत, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गुरुनानक देव साहेब यांनी जे विचार संपूर्ण देशांमध्ये पोहोचविले. त्यामुळे एक मोठा नानकपंथी समाज उभा राहिला, त्यामध्ये शीख समाजाबरोबर सिंधी लमानी बंजारा शिकलगार समाजही आहे. गुरुनानक देव साहेब यांनी जे विचार आपल्यासमोर ठेवले त्या विचारांवर चालण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे.

ते म्हणाले, दहा गुरूंची परंपरा खूप महान आहे. आपल्या गुरूंनी नुसते विचार दिले नसून लढण्याची हिंमत व ताकद पण आपल्याला दिली आहे. गुरु तेग बहादूर सिंग यांच्या शहादतचा 350 वे पर्व सुरू आहे. त्यांना आजही "हिंद की चादर" असे संबोधले जाते. त्यांनी काश्मिरी पंडितांची जुलुमातून सुटका करण्यासाठी लढा दिला. गुरुगोविंद सिंग यांनी हा वारसा पुढे चालविला.


श्री.फडणवीस म्हणाले की,गुरु पुरव पर्वात महाराष्ट्र सरकार सामील होईल. शासनाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गुरूंची गाथा जनसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पंजाब साहित्य अकॅडमीची पुनर्निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून त्यांचे विचार जनसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल. अकरा लोकांची कमिटी स्थापन करण्यात आली असून या कमिटीच्या माध्यमातून संवाद साधला जातो. समाजासाठी आवश्यक बाबींची माहिती या कमिटीच्या मार्फत शासनास कळविली जाते. निर्वासित लोक, प्रार्थना स्थळे यांना जागा देण्यात येणार आहे. मदरसे यांना ज्याप्रमाणे मदत केली जाते त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना शासनाकडून मदत करण्यात येणार आहे.यावेळी आयोजक आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुख्यमंत्री महोदयांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

## खडवली येथील अवैध वस्तीगृहातून २१ बालकांची सुटका

### संचालकांसह पाच जणांवर गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे 'पसायदान विकास संस्था' या नावाने चालविल्या जाणाऱ्या एका अनधिकृत बालकांच्या निवासी संस्थेतून जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करत 29 बालकांची सुटका केली आहे. संस्थेत बालकांना जबर मारहाण तसेच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याची तक्रार चाईल्ड हेल्प लाईनवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी संस्थेचे संचालक, त्यांच्या पत्नी, मुलगा आणि त्यांना मदत करणारे दोन अशा एकूण पाच जणांविरुद्ध बाल न्याय अधिनियम 2015 आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम 2012 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, 10 एप्रिल 2025 रोजी चाईल्ड हेल्प लाईनवर खडवली येथील 'पसायदान विकास संस्था' बाबत तक्रार आली होती. तक्रारीमध्ये संस्थेत बालकांना शारीरिक मारहाण केली जात असून लैंगिक अत्याचार होत असल्याचे नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची तातडीने दखल घेत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने 11 एप्रिल रोजी पोलिसांना सोबत घेऊन संस्थेची पाहणी केली. या पाहणीदरम्यान आणि बालकांशी संवाद साधल्यानंतर त्यांना शारीरिक इजा पोहोचेल, अशा प्रकारे मारहाण तसेच अल्पवयीन



मुलींसोबत लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले.

या गंभीर प्रकाराची दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत संस्थेत असलेल्या 29 बालकांची सुटका केली. यामध्ये 20 मुली आणि 9 मुलांचा समावेश आहे. सुटका केलेल्या सर्व बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आले. समितीने रात्री उशिरापर्यंत या बालकांच्या देखरेखेबाबत आदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

या प्रकरणी संस्थेचा संचालक बबन नारायण शिंदे, त्यांची पत्नी आशा बबन शिंदे, संचालक मुलगा प्रसन्न बबन शिंदे, त्यांना मदत करणारा प्रकाश सुरेश गुप्ता आणि दर्शना लक्ष्मण पंडित या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी खडवली येथील रहिवासी आहेत.

सुटका करण्यात आलेल्या बालकांपैकी काही खडवली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत होते. त्यांची आगामी परीक्षा लक्षात घेता, शिक्षण विभागाने त्यांच्या परीक्षेसाठी विशेष व्यवस्था करावी, यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधण्यात येत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाने या प्रकरणी तत्परतेने कार्यवाही केली असून, बालकल्याण समितीच्या आदेशानुसार सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. सध्या या बालकांना उल्हासनगर येथील मुलींचे विशेषगृह/बालगृह तसेच कनिष्ठ व वरिष्ठ मुलांचे शासकीय बालगृहात सुरक्षितपणे दाखल करण्यात आले आहे.

या कारवाईनंतर जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे यांनी सांगितले की, "बालकांची सुरक्षितता आणि त्यांचे हित हे प्रशासनाचे नेहमीच प्राधान्य राहिले आहे. बालकांच्या शोषणाबाबत आमची भूमिका 'झीरो टॉलरन्स'ची आहे आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन नेहमीच कटिबद्ध आहे. अशा गैरकृत्यांची तात्काळ दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, जेणेकरून भविष्यात कोणीही बालकांच्या भविष्याशी खेळण्याचे धाडस करणार नाही."

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, "आपल्या आसपास कोणत्याही स्वरूपाची बालकांसाठीची निवासी संस्था अनधिकृतपणे चालविली जात असल्यास किंवा बालकांचे शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा इतर कोणत्याही प्रकारचे शोषण होत असल्यास, तात्काळ 1098 या चाईल्ड हेल्प लाईन क्रमांकावर संपर्क साधावा. बालकांच्या अनधिकृत निवासी संस्था चालवणे आणि त्यांचे शोषण करणे हा बाल न्याय अधिनियमानुसार गंभीर गुन्हा आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे."

## लोकसंख्या, महानगरांची वाढ यामुळे अग्निशमन सेवेचे कार्य आव्हानात्मक


**- राज्यपाल सी पी राधाकृष्णन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वाढती लोकसंख्या, महानगरांची उर्ध्व दिशेने होणारी वाढ तसेच वाढती औदयोगिक क्षेत्रे यामुळे आग व इतर आपत्तींना तोंड देणे आव्हानात्मक झाले आहे. रसायनांमुळे उद्भवणाऱ्या आगी, औद्योगिक अपघात, नैसर्गिक संकट तसेच अतिरेकी हल्ल्यांमुळे अग्निशमन दलापुढे नवनवी आव्हाने ठाकत आहेत. या परिस्थितीत अग्निशमन सेवा दलापुढे पायाभूत सेवा-सुविधांचे रक्षण करणे, सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षा जपणे व औद्योगिक संपदेचे संरक्षण करणे ही महत्वाची जबाबदारी आली आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

मुंबई अग्निशमन दलातील तसेच राज्याच्या इतर महानगर पालिका येथील ८ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले.



अग्निशमन कार्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच ड्रोनचा वापर वाढविण्याबाबत अग्निशमन विभागाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे सांगताना दलाने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निरंतर कौशल्य वर्धन व प्रशिक्षण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले..

मुंबईसारख्या महानगरांमध्ये गृहनिर्माण संस्थांना अग्नी सुरक्षे संबंधी जनजागृती कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे तसेच गृहनिर्माण संस्था व औद्योगिक आस्थापनांचे नियमित फायर ऑडिट झाले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

अग्निशमन संशोधन संस्था निर्माण करा

अग्निशमन या विषयाचे सर्वंकष अध्ययन करण्यासाठी एक संशोधन संस्था निर्माण केली पाहिजे, अग्निशमन कार्यात नवनवे तंत्रज्ञान वापरले पाहिजे तसेच अग्निशमन कार्यासाठी पर्यावरण स्नेही अग्निरोधक विकसित केले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

अग्निशमन कार्यात सेवानिवृत्त अग्निशमन अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग केला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्ये युवकांसाठी कमी मुदतीचे अग्निशमन अभ्यासक्रम सुरु केले पाहिजे असे राज्यातील २९ सार्वजनिक विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपणास वाटते असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांनी मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी दीपक घोष, सब ऑफिसर सुनिल गायकवाड, लिडींग फायरमन पराग दळवी, फायरमन तातु परब, पुणे महानगरपालिकेतील फायर इंजिन वाहनचालक करीमखान पठाण, सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेतील फायरमन कसप्पा लक्ष्मण माने व पुणे महानगरपालिकेतील फायर अटेंडण्ट नरसिंहा पटेल यांना राष्ट्रपति पदक प्रदान केले. यावेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या पोशाखाला अग्निशमन ध्वजाचे तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दलाचे, औद्योगिक आस्थापनांचे तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी उपस्थित होते.

मुंबई डॉकयार्ड येथे सन १९४४ साली झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी व जवानांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस पाळला जातो तसेच या दिवसापासून अग्निशमन सप्ताह पाळल्या जातो.

## धसई परिसरात वादळी वाऱ्यासह गारपीट

### वीज पडून तरूणीचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : अवकळी पाऊसाचा व रविवार हा बारावीची परिक्षा दिलेल्या तरूणीला घातवार ठरला आहे, तालुक्यातील धसई परिसरात काल संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास विजांचा कडकडाट वादळीवा-यात किरपणपाडा येथील सविता वेंखडे ५५ या महिलेच्या अंगावर झाड पडल्याने गंभिर जखमी झाली आहे, संध्याकाळच्या सुमारास तासभर अवकाळी वादळीवा-यांने जनजीवन विस्कळीत करून लोकांची तारांबळ उडवली,धसई लगतच्या अल्याणी गावातील व नुकतीच बारावीची परिक्षा दिलेली कु,रविना राजाराम सांडे (वय १८). दुचाकी वरून



वडिलांसोबत धसई कडून घरा कडे जात असता धुंवाधारपाऊस थांबला की घराकडे जाऊ म्हणून एका घरालगतच्या बाकड्यावर बापलेक बसली असता तीच्या अंगावर विज पडून ही दुर्घटना घडली. जखमी झालेल्या रविना हिला त्वरित टोकावडे येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले; मात्र तेथील डॉक्टरांनी तिला उपचारांपूर्वीच मृत घोषित केले. तरुणीच्या मृत्यूबद्दल परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**अवकाळी पावसाने विटभट्टी वाल्यांना मात्र उघड्यावर आणून ठेवले आहे,घडलेली घटना हि अत्यंत दुर्दैवी असून शासनाच्या निकषा प्रमाणे पंचनामा करण्यात येऊन तात्काळ शासकिय मदत देण्यात येईल.**
**- अभिजित देशमुख , तहसिलदार मुरबाड**



# गीतासार



## अध्याय ७
## ज्ञानविज्ञानयोगः

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन । भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ ७-२६ ॥

हे अर्जुना, पूर्वी होऊन गेलेल्या, वर्तमान काळातील आणि पुढे होणाऱ्या सर्व सजीवांना मी जाणतो. पण श्रद्धा, भक्ती नसलेला कोणीही मला जाणत नाही. ॥ ७-२६ ॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत । सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परन्तप ॥ ७-२७ ॥

हे भरतवंशी परंतप अर्जुना, सृष्टीत इच्छा व द्वेष यांमुळे उत्पन्न झालेल्या सुखदुःखरूप द्वंद्वाच्या मोहाने सर्व सजीव अत्यंत अज्ञानाला प्राप्त होतात. ॥ ७-२७ ॥

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् । ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ॥ ७-२८ ॥

परंतु निष्कामभावाने श्रेष्ठ कर्मांचे आचरण करणाऱ्या ज्या पुरुषांचे पाप नष्ट झाले आहे, ते राग-द्वेष यांनी उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वरूप मोहापासून मुक्त असलेले दृढनिश्चयी भक्त मला सर्व प्रकारे भजतात. ॥ ७-२८ ॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये । ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ ७-२९ ॥

जे मला शरण येऊन वार्धक्य व मरण यांपासून सुटण्याचा प्रयत्न करतात ते पुरुष, ते ब्रह्म, संपूर्ण अध्यात्म आणि संपूर्ण कर्म जाणतात. ॥ ७-२९ ॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः । प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ७-३० ॥

जे पुरुष अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ यांसह (सर्वांच्या आत्मरूप अशा) मला अंतकाळीही जाणतात, ते युक्त चित्ताचे पुरुष मला जाणतात, म्हणजे मला येऊन मिळतात. ॥ ७-३० ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील ज्ञानविज्ञानयोगः नावाचा हा सातवा अध्याय समाप्त झाला. ॥ ७ ॥


## आरोग्य


# ताडगोळे शरीरासाठी फायदेशीर

गोड शहाळ्यासारखं पाणी आणि बाहेरून जेलीप्रमाणे लिबलिबित असणारे पण चवीला उत्तम असा हा ताडगोळा आरोग्यासाठीही फायदेशीर ठरतो. याची चव ही शहाळ्यातील पाण्यासारखीच असते उन्हाळ्याच्या दिवसात शरीर अधिक हायड्रेट राहण्याची गरज असते. ताडगोळ्यामध्ये अधिक प्रमाणात पाणी असल्याने आणि यातून अधिक एनर्जी मिळत असल्याने शरीर हायड्रेट राहण्यास मदत मिळते. बद्धकोष्ठता, पोट फुगणे, जळजळ अशा समस्या सुरू असतील तर ताडगोळ्याचे सेवन करावे. त्यामुळे ताडगोळा खाल्लास पोट लवकर भरते. याशिवाय ताडगोळे पाणीदार असल्याने जास्त भूक लागत नाही आणि वेट लॉस होण्यास मदत मिळते.

ताडगोळ्यातील अँटीऑक्सिडंट्स त्वचा निरोगी ठेवण्यास आणि त्वचेच्या समस्या कमी करण्यास मदत करतात. त्यातील पोटॅशियम यकृताशी संबंधित विकार कमी करते.

# संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक
# डॉ.वि.रा.करंदीकर





संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. वि. रा. करंदीकर यांच्या निधनाने महाराष्ट्र एका सत्शील, बुद्धिवादी आणि ध्येयनिष्ठ अशा व्यक्तिमत्त्वाला मुकला आहे. संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राला, संतांच्या विचारांचे कालानुरूप दर्शन घडविणाऱ्या समीक्षकांचीही एक परंपरा लाभली आहे. डॉ. करंदीकर हे त्या परंपरेचे पाईक होते. २७ ऑगस्ट १९१९मध्ये जन्मलेल्या करंदीकरांची जडण-घडण एका विशिष्ट परिस्थितीत झाली. त्यांचे बालपण प्रतिकूलतेचा सामना करण्यात गेले. गरिबीशी संघर्ष करीत त्यांनी विद्याभ्यास तर केलाच; पण जोडीला स्वामी विवेकानंदांच्या विचारांची कास धरली. वयाची १७ वर्षे संपत असतानाच विवेकानंदांच्या प्रतिमेसमोर त्यांनी प्रतिज्ञा घेतली आणि नंतर तिचे विस्मरण कधी होऊ दिले नाही. या प्रतिज्ञेनुसार ते ध्येयवादाच्या मार्गाने चालत मात्र राहिले. जवळ जवळ १० वर्षे ते देशासाठी वणवण फिरले. मात्र, ही सारी वर्षे आयुष्यातील एक फार वेगळे पर्व होऊन गेले, असे खुद्द त्यांनीच म्हटले आहे. मॅट्रिकनंतर ते काही काळ मसुराश्रमात राहिले. नंतर ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. प्रचारक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. आठ वर्षांच्या खंडानंतर शिक्षण पुढे नेले. एमएच्या परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम आले. यथावकाश पीएचडीही झाले. तेथून ते शिक्षणक्षेत्रात स्थिरावले. त्यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्यालाही गती आली. 'वामन पंडितांची यथार्थदीपिका', 'ज्ञानदेवांचा गीतासंवाद', 'ज्ञानदेवांचा आत्मसंवाद', 'ज्ञानेश्वरी दर्शन', 'रामकृष्ण-विवेकानंद' आदी पुरस्कारविजेत्या पुस्तकांसह २२ ग्रंथांची निर्मिती त्यांनी केली. पुणे विद्यापीठाने ज्ञानदेव अध्यासनाची स्थापना केल्यानंतर त्याचे प्रथम प्राध्यापक होण्याचा मान त्यांनाच मिळाला. करंदीकर हे भरपूर फिरत. काश्मीर ते कन्याकुमारी आणि द्वारका ते कोलकाता असा उभा आणि आडवा प्रवास त्यांनी तीन-चार वेळा केला. हिमालयातही ते अनेकदा जाऊन आले. व्याख्यानाच्या निमित्ताने महाराष्ट्रातही त्यांचा सर्वत्र संचार होता. रामकृष्ण मठ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, मराठी शब्दकोश, तरुण भारत आदी संस्थांशी त्यांचा जवळून संबंध होता. 'कुणा यात्रिकाचा जीवनसंवाद' या नावाने करंदीकर यांनी स्वतःची कहाणी उलगडली आहे. त्यात परमेश्वराबद्दल ते म्हणतात, 'हरएक गोष्ट करताना काय योग्य आणि काय अयोग्य हे आपली सदसद्विवेकबुद्धी आपल्याला नित्य सांगत असते. तेथे त्या परमेश्वराची चाहूल लागते. त्या सदसद्विवेकबुद्धीला साद देणे म्हणजे परमेश्वराशी नाते जोडणे.' परमेश्वराशी असे नाते जोडणाऱ्या एका 'यात्रिका'ने इहलोकीचा प्रवास संपविला आहे.

# भारतातील सर्वांत आनंदी राज्य कोणतं?

### – हॅपीनेस इंडेक्सवर आधारित एक विश्लेषण
### डॉ. भारत कऱ्हाड, दापोली.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशात भाषा, धर्म, संस्कृती, रहाणीमान आणि भौगोलिक विविधता प्रचंड प्रमाणात आढळते. अशा देशात नागरिकांचा 'आनंद' किंवा 'हॅपीनेस' मोजणे हे खूपच गुंतागुंतीचं काम असतं. मात्र, 'हॅपीप्लस कन्सल्टिंग' या संस्थेने नुकत्याच जाहीर केलेल्या 'इंडियन हॅपीनेस इंडेक्स रिपोर्ट'मधून भारतातील सर्वांत आनंदी राज्यांची यादी समोर आली आहे. या यादीतील राज्यांचे आनंदाचे निकष काय आहेत, आणि सर्वांत आनंदी व कमी आनंदी राज्य कोणते आहेत, यावर एक सविस्तर नजर टाकूया.

भारतभर विविध प्रकारच्या हवामानात आणि भौगोलिक परिस्थितीत लोक राहत असले तरीही, त्यांच्या आनंदी जीवनमानाचे कारण केवळ निसर्गसौंदर्य नसते. सामाजिक स्थैर्य, आर्थिक स्थिरता, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, सांस्कृतिक मूल्ये, नोकरीच्या संधी आणि कौटुंबिक सहकार्य या सर्व बाबी देखील आनंदी जीवनासाठी महत्त्वाच्या ठरतात.

#### सर्वेक्षणाचे निकष:

'इंडियन हॅपीनेस इंडेक्स रिपोर्ट'मध्ये लोकांच्या आनंदाचे मोजमाप करण्यासाठी जीवनातील समाधान, भावनिक स्वातंत्र्य,समर्थन करणारा सामाजिक गट, निवडीचे स्वातंत्र्य, उदारता, पर्यावरणीय गुणवत्ता, अणि प्रशासनातील पारदर्शकता या निकषांच्या आधार घेतला आहे.

भारतातील सर्वांत आनंदी राज्य – हिमाचल प्रदेश: ह्या यादीत हिमाचल प्रदेश पहिल्या क्रमांकावर आहे. हिमालयाच्या कुशीत वसलेलं हे राज्य नैसर्गिक सौंदर्याने समृद्ध आहे. इथले लोक शांत, सहृदयी आणि समृद्ध सामाजिक संबंध जोपासणारे आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात राहणं, कमी प्रदूषण, चांगली आरोग्यसेवा, पर्यटन व्यवसायातून मिळणारा रोजगार आणि सुसंस्कृत सामाजिक व्यवहार यामुळे हिमाचल प्रदेशात राहणारे लोक अधिक आनंदी आहेत.

#### टॉप 10 आनंदी राज्यांची यादी



1. हिमाचल प्रदेश – नैसर्गिक सौंदर्य, सामाजिक सौहार्द
2. मिझोरम – कमी गुन्हेगारी, मजबूत समाजव्यवस्था
3. अंदमान आणि निकोबार बेटे – शांतता, पर्यटन
4. पंजाब – समृद्ध शेती, सामाजिक नातेसंबंध
5. गुजरात – औद्योगिक प्रगती, आर्थिक स्थिती
6. सिक्कीम – स्वच्छता, पर्यावरणपूरक जीवनशैली
7. पुद्दुचेरी – फ्रेंच वारसा, आध्यात्मिक शांतता
8. अरुणाचल प्रदेश – जैवविविधता, शांत जीवन
9. केरळ – उच्च साक्षरता, उत्कृष्ट आरोग्यसेवा
10. मेघालय – निसर्गरम्य जीवन, मातृसत्ताक समाज

या यादीत काही आश्चर्यकारक गोष्टी देखील दिसतात. उदाहरणार्थ, अंदमान आणि निकोबार सारखी बेटं, जिथे खंडप्राय देशाच्या मुख्य प्रवाहापासून तुटलेली वस्ती आहे, ती देखील तिसऱ्या क्रमांकावर आनंदी आहे. यामागे निसर्ग, शांततेने भरलेलं जीवन आणि कमी सामाजिक दडपण ही मुख्य कारणं आहेत.

**संदर्भः हॅपीप्लस कन्सल्टिंग - इंडियन हॅपीनेस इंडेक्स रिपोर्ट २०२५**
**स्रोतः TV९ मराठी (१३ एप्रिल २०२५)**
**डॉ भारत कऱ्हाड (प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी)**

#### सर्वांत कमी आनंदी राज्य – उत्तर प्रदेश:

दुर्दैवाने, ह्याच अहवालात उत्तर प्रदेश हे सर्वांत कमी आनंदी राज्य ठरलं आहे. इथल्या नागरिकांना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींना सामोरं जावं लागतं. बेरोजगारी, महिलांवरील अत्याचार, सामाजिक असुरक्षितता, भ्रष्टाचार, आणि शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील दुर्लक्ष यामुळे इथल्या लोकांच्या जीवनात समाधानाचा अभाव आहे. सरकारकडून अनेक योजना असल्या तरी त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने न झाल्याने सामान्य नागरिकांचं जीवनमान उंचावलेलं नाही.

#### आनंदाच्या मार्गावर भारत:

भारत सरकारने 'इज ऑफ लिव्हिंग', 'स्वच्छ भारत मिशन', 'स्मार्ट सिटी' अशा योजनांद्वारे नागरिकांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक शहरे आणि राज्यांमध्ये सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा झाल्याचे दिसते. परंतु अद्याप खूप राज्यांमध्ये आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रोजगार, आणि स्त्रियांच्या सुरक्षेसारख्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करणं गरजेचं आहे.

एकुणच, 'हॅपीनेस इंडेक्स' हे केवळ एक आकड्यांमधील तक्ताच नाही, तर तो राज्यांच्या धोरणांची आणि नागरिकांच्या जीवनशैलीची एक आरसासुद्धा आहे. नागरिक आनंदी असतील, तरच ते उत्पादक ठरतील, समाज प्रगत होईल आणि राष्ट्र समृद्ध होईल. यासाठी प्रत्येक राज्याने केवळ GDP नव्हे, तर GHP – Gross Happiness Product याकडे लक्ष देणं आवश्यक आहे. या सर्वेक्षणातून आपण हे शिकू शकतो की आर्थिक प्रगतीच्या जोडीला सामाजिक सौहार्द, पर्यावरण जपणं आणि चांगली प्रशासन व्यवस्था हेसुद्धा आनंदाच्या मूलभूत गोष्टी आहेत.

# तक्षशिला विद्यालयाला डॉ. आंबेडकरांची सोन्याची प्रतिमा गिफ्ट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित असणारे प्रसिद्ध गोल्डमॅन रोहित पिसाळ यांनी उल्हासनगरातील महामहिंद इंटरनॅशनल धम्मदूत सोसायटी संचालित तक्षशिला विद्यालयाला 6 फुटांची सोन्याची प्रतिमा गिफ्ट केली आहे. महाराष्ट्रातील ही अशी एकमेव प्रतिमा असून त्याची किंमत 70 लाख रुपये आहे.

4 जानेवारी रोजी रोहित पिसाळ हे त्यांचे पँथर सहकारी दिपक धनावडे व सुबोध गोंडाणे यांच्या आग्रहास्तव तक्षशिला विद्यालयात स्नेह संमेलन कार्यक्रमासाठी आले होते. तेव्हा विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित काही भावनिक करून सोडणारे प्रसंग सादर केल्यावर उपस्थितांचे डोळे पानाहून गेले होते. रोहित पिसाळ यांचे अश्रूही अनावर झाले होते. त्यावेळी त्यांनी विद्यालयाला डॉ. बाबासाहेबांची सोन्याने मढवलेली प्रतिमा गिफ्ट करणार असे जाहीर आश्वासन दिले होते. रोहित पिसाळ यांनी आश्वासनाची पूर्तता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी केली. संस्थेचे अध्यक्ष आदरणीय भदन्त डॉ. एन. आनंद महाथेरो, रोहित पिसाळ यांनी सकाळी ह्या सोन्याच्या प्रतिमेची सुभाष टेकडी, कुर्ला कॅम्प परिसरातून रॅली काढून सर्वात शेवटी तक्षशिला महाविद्यालयाच्या कार्यालयात याचे प्रतिस्थापना केली. यावेळी महामहिंद इंटरनॅशनल धम्मदूत सोसायटीचे कोषाध्यक्ष व्हि टी वानखेडे, संचालक सुबोध गोंडाणे, रिपाई अंबरनाथ चे अध्यक्ष दिपक धनावडे, कार्यालयीन अधीक्षक आखरिखत सव्वाखंडे, उपाध्यक्ष डी. बी. इंगळे, अश्विनी धांडे, अर्चना अहिवले, आर. सी. रायबोले, मनोज डोंगरदिवे, मुख्याध्यापक अस्मिता भालेराव, भारती देवरे, माधूरी जाधव, पर्यवेक्षक आदिनाथ खाडे आणि शाळेतील हजारो विद्यार्थी उपस्थित होते. गोल्डमॅन रोहित पिसाळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोन्याच्या प्रतिमेला आंबेडकरी चळवळीतील एखाद्या मोठ्या कॉलेजला देण्याचा निर्णय घेतला होता. पण तक्षशिला विद्यालयाच्या स्नेह संमेलन कार्यक्रमासाठी आल्यावर उत्कृष्ट नियोजन आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे मन जिंकल्यावर त्यांनी ही प्रतिमा तक्षशिला विद्यालयाला गिफ्ट केल्याची माहिती सुबोध गोंडाणे यांनी दिली.

### कल्याण रेल्वे यार्ड परिसरात पुनर्रोपित केलेल्या

# झाडांच्या संरक्षणासाठी सामाजिक कार्यकर्ते सरसावले



### टँकर द्वारे पाणी नेऊन झाडांना दिले पाणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील रेल्वे यार्ड परिसरातील पुनर्रोपित केलेल्या मरणपंथाच्या मार्गावर असलेल्या झाडाच्या संजविनीसाठी पूर्वेतील सामाजिक पदाधिकारी, नागरिकांचा पुढाकाराने दोन दिवसापासून टँकर द्वारे पाणी नेऊन झाडांना दिले पाणी.

कल्याण पूर्वेत रेल्वे यार्डचा रिमोल्डिंग प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी रेल्वेच्या हद्दीतील (कल्याण पूर्व) शेकडो झाडांवर कुऱ्हाड चालवण्यात आली. तर काही जुनी झाडे अन्य ठिकाणी स्थलांतरित करून पुनर्रोपित करण्यात आली. यातील स्थलांतरित करून अन्यत्र पुनर्रोपित करण्यात आलेल्या सुमारे १५० जुन्या झाडांचे संवर्धन करण्यासाठी रेल्वे कडून काही लाखो रुपये हे कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उद्यान विभागाला देण्यात आले. परंतु गेल्या काही महिन्यांपासून संबंधित यंत्रणेने, ठेकेदाराने पूर्णतः याकडे दुर्लक्ष केल्याने ही झाडे मरणपंथाला जात आहे असे वृक्ष प्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते अॅड. धनंजय जोगदंड, विजय भोसले, वर्षा कळके, जितेंद्र शिर्के यांचे म्हणणे आहे.

ही झाडे जगावी यासाठी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरणाचे मुख्य उद्यान अधीक्षक तथा उपायुक्त संजय जाधव यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केला असताना सुद्धा आत्मा रुपी मरण पावलेल्या या महानगरपालिकेच्या प्रशासनाला काहीच फरक पडलेला नाही अशी खंत या सामाजिक कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केली. एकीकडे राजकीय नेते झाडे लावा झाडे जगाव असे आवाहन जनतेला करण्यासाठी करोड रुपये खर्च करत असतात. पण याउलट आहे ती झाडे पैसे घेऊन मारून टाका असा पवित्र कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उद्यान विभागाने घेतल्याचा आरोप या सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रविवारी या वृक्ष पुनर्रोपित केलेल्या ठिकाणी भेट देऊन या ठिकाणी टँकरने पाणी आणून मरणपंथाला लागलेल्या झाडांना पुनर्रोपित करण्यासाठी या झाडांना पाणी घालून कल्याण डोंबिवली महापालिकेचा निषेध केल असून त्यानंतर सुद्धा महापालिकेने याकडे दुर्लक्ष केले तर महापालिकेच्या मुख्यालयातच हजारो वृक्ष प्रेमी नागरिकांचा मोर्चा घेऊन येऊ असा इशारा सुद्धा या वेळी सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# खिंडीपाडा येथे १५६ निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची शिकवणूक जीवनात उतरवत मानवीयतेचा अत्यंत हृदयस्पर्शी व आदर्श दाखला म्हणून, संत निरंकारी सत्संग भवन, खिंडीपाडा येथे रविवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 156 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये संत निरंकारी मिशनच्या मुलुंड, खिंडीपाडा, गोशाळा, भांडूप, कोकण नगर आणि कांजूर मार्ग या शाखांमधील 250 पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी रक्तदानासाठी आपली नाव नोंदणी केली होती. यावरुन त्यांच्या "मानवतेचा करूया सन्मान, एकत्र येऊन करूया रक्तदान." या भावनेतून निष्काम मानवसेवेची प्रचिती येते. या शिबिराचे उद्घाटन सेक्टर संयोजक मुलुंड श्रीधर पाटील, व सेवादल क्षेत्रीय संचालक अमोल सुर्वे यांच्याहस्ते करण्यात आले. संत निरंकारी ब्लड बँक, विले पार्ले यांनी या शिबिरामध्ये रक्त संकलनाचे कार्य केले. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थानिक मुखी गिरधारी भक्तानी यांच्या देखरेखीखाली सेवादल स्वयंसेवक व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# कल्याणमध्ये रंगला नगरकर प्रिमियर क्रिकेट लीग स्पर्धेचा थरार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मध्ये आम्ही नगरकर प्रतिष्ठान आयोजित नगरकर प्रिमियर क्रिकेट लिग २०२५ चे आयोजन रविवारी करण्यात आले होते यामध्ये. आम्ही नगरकर मुंबई संघ(कर्णधार-बजरंग तांगडकर), आम्ही नगरकर राजस्थान रॉयल्स (कर्णधार -मंगेश शेळके), आम्ही नगरकर दिल्ली कॅपिटल, आम्ही नगरकर चेन्नई सुपर किंग(कर्णधार-नितिन भराट), आम्ही नगरकर कोलकत्ता नाईट रायडर (कर्णधार-विक्की फापाळे), आम्ही नगरकर हैदराबाद किंग्ज(कर्णधार-अमोल शिंगोटे) अशा एकूण ८ संघांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेत आम्ही नगरकर दिल्ली कॅपिटल संघ प्रथम विजेता तर दुसरे विजेता आम्ही नगरकर पंजाब किंग आणि तृतीय विजेता आम्ही नगरकर रॉयल चॅलेंज बँग्लोर विजेता ठरली. उत्कृष्ट फलंदाजी मध्ये प्रवीण सोमवंशी प्रदीप सोमवंशी बंधुना संयुक्त पारितोषिक, उत्कृष्ट गोलंदाज सुशिल खरे तर मालिकावीर अजिंक्य गायकर यांनी पारितोषिक पटकावले. अतिशय थरारक व रोमांचक क्रिकेट सामने पार पडले.

### अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट व संलग्न संस्था आयोजित

# महारक्तदान शिबिरात १५ हजार रक्तदात्यांचे रक्तदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट, श्री अनिरुद्ध आदेश पथक, दिलासा मेडिकल ट्रस्ट अॅण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर व इतर संलग्न संस्था आयोजित मुंबई वांद्रे येथील न्यु इंग्लिश स्कुल येथे आणि पुणे महाराष्ट्र व देशातील इतर भागात असे एकूण १२८ ठिकाणी रविवार दि.१३ एप्रिल रोजी भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांत १४९७४ रक्तपिशव्यांचे संकलन झाले.

अनिरुद्ध बापुंच्या मार्गदर्शनाने १९९९ पासुन सदर महारक्तदान शिबिर दरवर्षी आयोजित केले जाते. रविवारी ऊन्हाचा पारा चढता असुन देखिल रक्तदात्यांनी सर्व ठिकाणी अभूतपूर्व उपस्थिती दाखविली. मुंबई येथील रक्तदान शिबिरात ७२७५ पिशव्या रक्त संकलन झाले. पुणे येथे १०२२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर महाराष्ट्र व देशातील इतर भागातील १२६ ठिकाणी ६६७७ रक्तसंकलन झाले.

मुंबई येथील शिबिरात ३८ रक्तपेढ्यांनी सहभाग घेतला तर पुणे येथे ९ आणि इतर ठिकाणी १२९ रक्तपेढ्यांनी सहभाग नोंदविला. जवळजवळ २००० स्वयंसेवकानी या शिबिरासाठी शिस्तबद्ध नियोजनासाठी विशेष मेहनत घेतली. १९९९ पासुन ते आजतागायत सदर महारक्तदान शिबिरांद्वारे २२६७३३ रक्तपिशव्यांचे संकलन झाले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान



१४ एप्रिल या सोनेरी दिवसाचे समाजाच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. देशातील कोट्यवधी दीनदुबळ्यांसाठी तसेच देशासाठी हा दिवस फार आनंददायी आहे. या दिवशी दिवसभर मोठ्या उत्साहाने खेड्यापाड्यांपासून ते दिल्लीपर्यंत डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी म्हणजे एम.ए. पदवीसाठी २५ जुलै १९१३ रोजी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश केला. प्रो. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली जून १९१५ मध्ये एम.ए.ची पदवी संपादन केली. ऑक्टोबर १९१६ मध्ये इंग्लंडमध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथे एम.एस.सी. इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश केला. प्रो. कॅनन आणि सेडनी वेब यांच्या मार्गदर्शनाखाली १९२० मध्ये पदवी संपादन केली. पुढे १९२२-२३ मध्ये युनिव्हर्सिटी इन बॉन जर्मनीमध्ये डी.एस.सी. पदवीचा अभ्यास पूर्ण केला व पदवी संपादन केली. म्हणजे एम.ए., पीएच.डी., एलएल.डी., डॉ. डिलिट, बार अॅट लॉ इत्यादी पदव्यांनी उच्चविद्या विभूषित बाबासाहेब आंबेडकर झाले. बाबासाहेबांनी जगातील सामाजिक शास्त्रांचा (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आणि कायदा शास्त्र) सखोल अभ्यास केला. त्याचबरोबर जगातील साम्राज्यशाही, भांडवलशाही, जगातील युद्ध, स्वाऱ्या, लढाया आणि विविध क्रांत्यांचा अभ्यास केला. तसेच वंशवादाचा आणि जागतिक स्तरावर असलेल्या गुलामांच्या जीवनांचा अभ्यास केला.

डॉ. बाबासाहेबांच्या वाचनात, चिंतनात व लेखनात प्रचंड ताकद, शक्ती होती. ज्ञानसंपन्नतेच्या शक्तीमुळेच व्यक्ती, समाज, राज्य

**बाबासाहेबांची वैशिष्ट्ये**

**संशोधक, पत्रकार, लेखक, समाजशास्त्रज्ञ. अर्थशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, इतिहासकार, संविधानाचे जनक, तत्त्वज्ञानी, मानववंश शास्त्रज्ञ, दलित आणि महिला अधिकारांचे उद्धारक, पाली, बौद्ध साहित्याचे अभ्यासक, देशातील पहिले कामगारमंत्री, संस्कृत, हिंदी साहित्याचे अभ्यासक, राजनीतीतज्ज्ञ, विज्ञानवादी, जलतज्ज्ञ, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते, शेतकरी, गोरगरीब कामगारांचे उद्धारक.**

आणि राष्ट्र महान बनत असते, याची त्यांना पुरेपूर जाणीव झाली होती. त्यामुळे १८-१८ तास अभ्यास करून शेकडो वर्षांचा शिल्लक राहिलेला ज्ञानाचा बॅकलॉग बाबासाहेब भरून काढत होते. डॉ. बाबासाहेबांनी तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तिनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकवले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारताच्या नव्या उभारणीचे एक महान वैभव बनले होते. लोकशाही आणि राज्यघटना जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य आणि त्यांची एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकशाही असली तरीही त्याचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीमध्ये व्हावे, असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे हा देश टिकेल अन्यथा अडचणीत येईल. यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगीण विकास करता येईल, अशी राष्ट्राला राज्यघटना दिली. २१ व्या शतकात देशाला विकासाच्या दिशेने जावयाचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशिवाय पर्याय नाही, असे मला वाटते.

**आंबेडकरांचे लिखाण**

वृत्तपत्रे - मूकनायक १९२०, बहिष्कृत भारत १९२७, जनता १९३०, प्रबुद्ध भारत १९५६. ग्रंथ - शुद्र पूर्वी कोण होते दि अन्टचेबल्स (अस्पृश्य आणि अस्पृश्यता यावर सिद्धांत लिहिले) प्रॉब्लेम ऑफ दि रुपी पार्टिशन ऑफ इंडिया हिंदू कोड बिल भारताचे संविधान द बुद्धा अँड हिज धम्मा. अशी ५८ पुस्तके व ग्रंथ.

**- प्रा. डॉ. आर. एन. साळवे, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त

## केडीएमसी क्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्यांची विचारधारा, त्यांनी केलेल्या संघर्षाची माहिती जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि त्यामधून विशेषतः शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी या दृष्टिकोनातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळा, महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले.

यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर ग्रंथोत्सव, ग्रंथ प्रदर्शन, निबंध स्पर्धा, चित्रकला, वाचनाभिवादन तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थी वर्गाने हिरीरीने या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली.

ठाणे जिल्हा परिषदेमध्ये

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा परिषद, ठाणे येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाज कल्याण विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे आणि लेखाधिकारी (2) रविंद्र सपकाळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आ.राजेश मोरे यांनी अर्पण केला पुष्पहार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 वी जयंती निमित्ताने सोमवारी आमदार राजेश मोरे यांनी पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.

पूर्वेकडील इंदिरा चौकात शिवसेना डोंबिवली शहरप्रमुख तथा कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. यावेळी पालिका प्रभागक्षेत्र सहाय्यक आयुक्त संजय कुमावत, हेमा मुंबरकर, शिवसेना पदाधिकारी दत्ता वझे, कविता गावंड, सतीश मोडक, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश जोशी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती दिन केडीएमसीत उत्साहात साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134व्या जयंतीदिनानिमित्त आज कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी महापालिका मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याचप्रमाणे कल्याण पश्चिमेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयासही आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी माजी महापौर रमेश जाधव, उपआयुक्त अवधुत तावडे, संजय जाधव, कार्यकारी अभियंता अशोक घोडे, सहा.आयुक्त धनंजय थोरात, राजेश सावंत, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, क प्रभाग अधिक्षक ज्ञानेश्वर कंखरे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, इतर अधिकारी कर्मचारी वर्ग तसेच उपस्थित नागरिक यांनी देखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयास पुष्पसुमने वाहून अभिवादन केले.

महापालिकेच्या डोंबिवली विभागातही परिमंडळ चे उप आयुक्त रमेश मिसाळ यांनी जुन्या विभागीय कार्यालया जवळील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास आणि फ प्रभाग कार्यालयातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, संजयकुमार कुमावत, फ प्रभागाचे अधिक्षक जयवंत चौधरी, स्वच्छता अधिकारी शरद पांढरे तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कल्याण पूर्व येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग क्षेत्र कार्यालय परिसरात (ड प्रभाग) असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उप आयुक्त अतुल पाटील, सहा. आयुक्त उमेश यमगर, ड प्रभागाचे अधिक्षक मधुकर भोये त्याचप्रमाणे इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण पूर्वेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे लोकार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार जनसामान्यांमध्ये पोहोचवण्याचे महत्वाचे कार्य कल्याण येथे उभारण्यात आलेल्या ज्ञान केंद्रांच्या माध्यमातून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे करत आहेत. अशी ज्ञान केंद्रे संपूर्ण राज्यात उभारली जातील, अशी घोषणा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी कल्याण येथे केली. कल्याण पूर्वेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. रविवारी कल्याण पूर्वेतील ड प्रभाग समिती कार्यालयाच्या आवारात झालेल्या दिमाखदार सोहळयात देशातील आगळयावेगळया ज्ञान केंद्राचे लोकार्पण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपट होलोग्राफी, विविध माहितीपटाच्या माध्यमातून येथे उलगडण्यात आला आहे.



शेकडो पुस्तकांचे ग्रंथालयही यात आहे.

या दिमाखदार सोहळयात शेकडोच्या संख्येने भीम बांधव उपस्थित होते. तसेच याप्रसंगी कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे आण्णा रोकडे, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनल गोयल, शिवसेनेचे कल्याण जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, निलेश शिंदे, प्रशांत काळे यांसह शिवसेना, भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांचे साहित्य, त्यांची आंदोलने आणि विचार होलोग्राफीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी आता कल्याणकरांना मिळणार आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या ड प्रभाग कार्यालयाशेजारी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील ज्ञान केंद्राचे लोकार्पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल रोजी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे अपरिहार्य कारणामुळे दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.

### कल्याणसारखे ज्ञान केंद्र राज्यभर उभारणार
### - मंत्री उदय सामंत, संजय शिरसाठ यांची घोषणा

यावेळी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या स्मारकाचा प्रवास उलगडून सांगितला. स्थानिकांची मागणी होती त्यानुसार हे स्मारक उभे राहिले. यात संघर्ष समितीपासून अनेकांचे योगदान आहे, असे यावेळी डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले. परस्पर संवादी (इंटरॅक्टिव) पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जीवनगाथा कळावी हे ज्ञान केंद्र उभारण्या मागचा मुख्य हेतू होता. या केंद्रात एक ते दीड तासात आगळावेगळा अनुभव मिळेल. या स्मारकासाठी प्रयत्न करणाऱ्या आणि पाठबळ देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही डॉ. शिंदे यांनी आभार मानले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीपूर्वी स्मारकातील ज्ञान केंद्र सुरू करू असा आम्ही दिलेला शब्द आज पूर्ण केला, असेही यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले.

नागरिकांच्या मागणीनुसार आणि वेगळया संकल्पना अंमलात आणण्यासाठी इच्छाशक्ती लागते, ती इच्छाशक्ती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे आहे, असे गौरवोद्गार सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी यावेळी काढले. या स्मारकाची कॉपी आम्हीही करणार. राज्यभर असे ज्ञान केंद्र उभारणार अशी घोषणा यावेळी मंत्री संजय शिरसाठ यांनी केली. तर बाबासाहेबांचे विचार जनसामान्यांमध्ये पोहोचवण्याचे काम खासदार डॉ. श्रीकांत शिंदे करत आहेत. ही संकल्पनाच खूप मोठी आहे. त्यामुळे असे ज्ञानकेंद्र संपूर्ण राज्यात उभे करायला हवेत, असे मत यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. या ज्ञान केंद्राची प्रतिकृती आम्हीही साकारणार असेही यावेळी सामंत म्हणाले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर जंयती निमित्त

## कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या हस्ते ड्रेस वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : विश्वभूषण, भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४व्या जंयती निमित्ताने वरप अंगणवाडी शाळेतील मुलांना नवीन ड्रेस वाटप कार्यक्रम करण्यात आला, यावेळी कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, प्रसिद्ध उद्योजक मोहनशेठ(बाबा) पत्रकार संजय कांबळे, अंगणवाडीच्या श्रीम वनिता कांबळे आणि परिसरातील विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वरप येथील डॉ अक्षय पॅलेस हौसिंग सोसायटीच्या वतीने यंदा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४व्या जंयती उत्साहाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी परिसरातील गोरगरीब, आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत ड्रेस चे वाटप कल्याण चे तहसीलदार सचिन शेजाळ, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, प्रसिद्ध उद्योजक मोहनशेठ(बाबा)यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, दिप प्रज्वलन झाले.त्यानंतर त्रिशरण, पंचशील घेण्यात आले. यानंतर वरप जिप शाळा अंगणवाडी केंद्रातील मुला मुलींना ड्रेस वाटप करण्यात आले. याप्रसंगी कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे आज तूम्ही मी आहे, त्यांचे कार्य सांगायचे म्हटलं कित्येक तास, दिवस अपुरे पडतील, तर कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी पत्रकार संजय कांबळे यांच्या कामाचे कौतुक केलं. तर वरप येथे वाटप झाल्यानंतर मानिवली आदीवासी वाडितील मुलांना ड्रेस वाटप करण्यात आले.यावेळी तेथील अंगणवाडी सेविका रोहिणी गायकर, मदतनीस सुनीता गायकर, इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी कल्याण पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी तथा वरप ग्रामपंचायतीचे प्रशासक दिनेश घोलप, ग्रामपंचायत अधिकारी तानाजी पाखरे, आदींनी भेट दिली. तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आकाश चौधरी, देवेश पडवळ, हिंमाशू कांबळे, आंशू कांबळे, यश चौधरी, दिनेश प्रसाद, संतोष चौधरी, आदींनी मेहनत घेतली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीकांत कांबळे यांनी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'घर घर संविधान' उपक्रमाला सुरुवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी मिरा भाईंदर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहाने व गौरवपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. संविधानाचे शिल्पकार, सामाजिक न्यायाचे अग्रदूत आणि आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत, मिरा भाईंदर महानगरपालिकेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



या विशेष दिवशी, सकाळी ९.०० वाजता मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता भाईंदर पश्चिम रेल्वे फाटकाजवळील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय प्रांगणात सकाळी ९.४५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळयांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर १०.०० वाजता मुख्य कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापालिकेच्या आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आले.

"घर घर संविधान" यावर्षी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा होत असून, त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या सूचनेनुसार "घर घर संविधान" हा जनजागृतीपर उपक्रम मिरा भाईंदर महानगरपालिकेत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. तसेच, "घर घर संविधान" उपक्रमाअंतर्गत संविधानाची जागरूकता, शिक्षण, संविधानिक मूल्यांची प्रेरणा, सक्रिय सहभाग आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणं हे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, सर्व प्रक्रिया शिस्तबद्ध आणि नियमांचे पालन करून पार पाडाव्यात, असे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी दिले.

सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत

## ज्येष्ठ नागरिकांकरिता कार्यशाळा संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त व "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह"च्या अनुषंगाने आज जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सुरू झालेल्या सामाजिक समता सप्ताहाचे हे दहावे वर्ष असून यावर्षी सालाबाद प्रमाणे सामाजिक समता सप्ताहास उत्स्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला असून आज आयोजित करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यशाळेस शासकीय सुटटीचा दिवस असून देखील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने "राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण २००७" या विषयावर व्याख्याते श्री.प्रमोद ढोकले यांनी या कायद्याची सहज व सोप्या भाषेत माहिती दिली. या व्याख्यानाला उपस्थित ज्येष्ठ नागरीक, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्तपणे दाद दिली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे, पारसिक ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर गाडे, कळवा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मधुसूदन गोडबोले, भाऊ कांबळे, रश्मी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रत्नाकर पवार, शासकीय अधिकारी-कर्मचारी व ज्येष्ठ नागरीक उपस्थित होते.

"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" कार्यक्रमांतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांची माहिती तथा कायद्याबाबतचे थोडक्यात विश्लेषण व श्रावणबाळ योजनेबाबतच्या येणाऱ्या अडचणीसाठीचे मार्गदर्शन सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे समाधान इंगळे यांनी केले.कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे आभार समाज कल्याण निरीक्षक अभिजित शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक लेखाधिकारी अरुण साळुंखे यांनी केले.

# शहापूरचे माजी आ.पांडुरंग बरोरा भाजपात प्रवेश करणार ?



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यात आपला राजकीय दबदबा कायम ठेवणारे माजी आमदार पांडुरंग बरोरा राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोड चिट्ठी देऊन लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा शहापूर तालुक्यात सुरु आहे. या बाबत पांडुरंग बरोरा च्या समर्थानी दुजोरा दिला नाही. मात्र आपलं राजकीय भवितव्य अबाधित ठेवण्यासाठी बरोरा समर्थक सत्ताधारी पक्षात जावे या मताचे बनल्याने माजी आमदार पांडुरंग बरोरा पक्षांतर करणार असल्याची चर्चा सुरु आहे.भाजपात प्रवेश करण्याचा पांडुरंग बरोरा यांचा मनोदय असल्याचे त्यांच्याच निकटवरतीयाकडून समजले आहे. त्यांचा पक्ष प्रवेश दरम्यान त्यांच्या सोबत राष्ट्वादी शरद पवार गटाचे कोण कोण? भाजपात प्रवेश करणार आहेत याबाबतची स्पष्टता अद्याप अस्पष्टच आहे.

# उंबर्डे तलावाला मिळणार नवसंजीवनी

## उंबर्डे तलावाच्या सुशोभीकरणामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडणार

### -आ.विश्वनाथ भोईर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अमृत-२ योजने अंतर्गत कल्याण पश्चिमेतील उंबर्डे येथील तलाव शुशोभीकरण (पुनरूज्जीवन) करणे कामाचे भूमिपूजन कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. या उंबर्डे तलावाच्या सुशोभीकरणामुळे उंबर्डे गावाच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे मत यावेळेस आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केले. आमदार भोईर यांनी शासनाकडे पाठपुरावा करून तलाव सुशोभीकरणासाठी सात कोटी रुपये मंजूर करून आणले आहेत. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवुन सुशोभीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले की, कल्याण पश्चिम मतदार संघात अनेक जुने तलाव आहेत, त्यांची डागडुजी व सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नाहीतर तलाव नाहीसे होतील, म्हणून शासनाकडे पाठपुरावा करून कल्याण पश्चिम भागातील सुरूवातीला पाच तलावांच्या सुशोभीकरणासाठी निधी मंजूर करून घेतला आहे. त्यातील आधारवाडी येथील तलावाच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे, तर आता उंबर्डे गावातील जुन्या तलावाच्या सुशोभीकरण कामाला सुरुवात केली असल्याचे सांगितले.

यावेळी माजी नगरसेवक जयवंत भोईर, प्रभुनाथ भोईर, वैशाली भोईर,पुष्पा भोईर, युवासेनेचे जिल्हा चिटणीस वैभव भोईर, परिवहन सदस्य सुनील खारुक,राष्ट्रपती पुरस्कार विजेते अशोक भोईर, छत्रपती पुरस्कार विजेते चैनु लोखंडे, भाजपचे ओबीसी सेल शहर अध्यक्ष शत्रुघ्न भोईर, समाजसेवक नंदु शेलार, रामदास कारभारी, गणेश कारभारी, दिपक पाटील, यांच्या सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आमदार विश्वनाथ भोईर यांच्या प्रयत्नाने अमूत-२ योजनेतून निधी मंजूर

## सावरणे,मोरोशी,टोकावडे,उमरोली,धसई परिसरात

# वादळी वाऱ्यासह गारपीट पाऊस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात १३एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ६.३० या कालावधीत सावरणें, मोरोशी, टोकावडे,उमरोली या विभागात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे,या संपूर्ण परिसरातील,अनेक वृक्ष, विजेचे खांब उन्नमळून पडले असून अनेक घरावरील कौले पत्रे छप्पर उडून खुप मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. जवळपास या परिसरात दीड तास पाऊस पडत होता त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काही प्रमाणात गारव्याच दिलासा मिळाला.

अवकाळी पावसाने टोकावडे व धसई परिसरात मोठा फटका बसल्याचे चित्र दिसून येत आहे त्यातच परिसरात घरून धसई कडे जात असताना रवीना राजाराम सांडे(वय १८) या तरुणीवर वीज पडून या तरुणीचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली आहे. सोबत वडील राजाराम शंकर सांडे होते. अचानक आलेल्या पाऊस व वादळ वाऱ्याने महाराष्ट्र मिलिटरी स्कुल या शाळेवरील इमारतीचे संपूर्ण छत उडून गेले असून खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



घरावरील कौले,पत्रे छप्पर उडवून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान!

# मायणी गावात महिलांसाठी शिवणकाम प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामुळे कुटुंबात व पर्यायाने समाजामध्ये आर्थिक वाढ व समृद्धी येते. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत नाही. महिला आपले निर्णय स्वतः घेऊ शकतात. मायणी गावातील व परिसरातील महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या मायणी शाळेमध्ये रॅमकी फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने महिलांसाठी मोफत शिलाई काम प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहे. रॅमकी फाउंडेशनने या प्रशिक्षण वर्गासाठी अकरा शिलाई मशीन उपलब्ध केल्या असून या महिलांना चांगले प्रशिक्षण मिळावे म्हणून उत्तम प्रशिक्षकांची नेमणूक केलेली आहे. सध्या या प्रशिक्षण वर्गामध्ये मायणी व आसपासच्या वाड्या वस्त्यांवरील २५ महिला प्रशिक्षण घेत असून शेडाशी कातकरवाडी येथील आदिवासी महिलाही हे प्रशिक्षण घेत आहेत. नुकतेच गागोदे केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर यांनी या प्रशिक्षण वर्गात भेट दिली त्यावेळी मायणी शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी त्यांना या प्रशिक्षण वर्गाची माहिती दिली. प्रशिक्षणार्थी महिलांनी रॅमकी फाउंडेशनचे आभार मानले

# कबुतरांच्या सहवासाने गंभीर आजार होऊ शकतो

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पक्ष्यांची कितीही काळजी आणि पक्षी प्रेम असले तरी आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे आहे. कबुतरांची संख्या वाढत असून त्यांना दाणा पाणी देताना मात्र आपल्याला 'हायपर सेन्सेटिव्हटी न्यूमोनायटिस' आजार होण्याची शक्यता असते. कबुतरांची विष्ठा व पिसामुळे विकार वाढल्याचे दिसते. शहरातील कबुतरांची संख्या वाढत असून मानव वस्तीपासून ते लांब असावे म्हणून 'कबुतर जा जा 'अशी म्हणण्याची वेळ आली आहे. लीलावती रुग्णालय व डोंबिवलीतील ओजस रुग्णालयातील चेस फिजिशियन डॉ. दीप्ती बडवे - कुलकर्णी यांच्याशी डोंबिवली पत्रकार संघाचा वार्तालाप आयोजित करण्यात आला होता.

कबूतरांची विष्ठा व गळालेले पिसे यामुळे मानवी आरोग्याला धोका' या गंभीर विषयावर डोंबिवली पत्रकार संघाने एक परिसंवाद डोंबिवली पूर्वेकडील टिळकनगर पोस्ट ऑफिसजवळील ओजस हॉस्पिटल येथे आयोजित केला होता. यावेळी संघांचे अध्यक्ष व सचिव यांनी उपस्थिती पत्रकारांना डॉ. दीप्ती बडवे -कुलकर्णी यांची ओळख करून दिली. यावेळी डॉ. दीप्ती बडवे म्हणाल्या, कबुतरांची विष्ठा व गळलेली पिसे यामुळे मानवाच्या फुफ्फुसचे आजार होतात. कबुतरांना दाणा पाणी देताना मानवी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. आपण पाहतो की कबुतरांची संख्या वाढत आहे. कबुतरे आपल्या परिसरात येत असतात. कबुतरे टोलेजंग इमारतीजवळ वास्तव करतात. येथेच अंडी घालतात व विष्ठा करतात. विष्ठा व गळलेली पिसे ही मानवी आरोग्याला धातक आहेत.



### हायपर सेन्सेटिव्हटी न्यूमोनायटिस आजार होण्याची शक्यता..




### दाणा पाणी देताना आपल्या आरोग्याची काळजी घ्या...

कबूतरांची विष्ठा इतकी सूक्ष्म असते की ते तिचा थेट मानवी श्वसनावर परिणाम होतो. कबुतरांच्या संपर्कात असलेल्यांना दम लागणे, खोकला व ताप येणे ही लक्षण दिसल्यास त्यांनी तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. इतकेच नव्हे तर यामुळे 'हायपर सेन्सेटिव्हटी न्यूमोनायटिस' आजार होऊ शकतो. कबूतरांना दाणा टाकणे हे आधी थांबविले पाहिजे. आपल्या घराच्या बाल्कनीत जाळी लावावी जेणेकरून कबुतर आत येणार नाहीत.

कबूरतरांची विष्ठा अत्यंत ऍसिडिटी असून त्यातील घातक केमिकल्स हवेतून जलद प्रसार होतो. परिणामी घशाचे रोग, श्वसनाचा त्रास, दम्याचा अटॅक व रोगप्रतिकारक शक्तीसाठी घातक असते.

# मुरबाड श्रीराम मंदिरामध्ये ३०० लोकांची वैद्यकीय तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड येथील श्रीराम मंदिरामध्ये रविवारी १३ एप्रिल २०२५ रोजी ३०० लोकांची निशुल्क वैद्यकीय तपासणी करण्यात आली अस्थिरोग, गुडघेदुखी, फ्रॅक्चर ,मधुमेह, रक्तदाब, मणक्याचे विकार, मान दुखी , डोळ्यांचे विकार व मोतीबिंदूची चाचणी , बालरोगचिकित्सा, संधिवात रुग्णांची डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली सायन रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर मोहन जोशी व मुरबाड येथील डॉ. हरिश्चंद्र पारधी आदींनी या शिबिरासाठी उपस्थिती लावली

श्री हनुमान उपासक कै. डॉ. अच्युत उर्फ बाळ जोशी व कै. मालती जोशी ह्यांच्या स्मरणार्थ हे शिबिर आयोजित करण्यात आले होते डॉ. अश्विन जोशी , अस्थिरोग तज्ञ, डॉ नंदन मराठे , मणक्याचे शल्यचिकित्सक डॉ. आयुषी ठाकर फिजिशीयन मधुमेह, रक्तदाब, पोषण, वजन व्यवस्थापन तज्ञ डॉ. अदिती जोशी व डॉ. अनुश्री भटकळ नेत्ररोग आणि रेटिना शल्यचिकित्सक , डॉ. वर्षील शाह बालरोग व लसीकरण तज्ञ , डॉ. सोहम कोवे फिजिओथेरपिस्ट असे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करण्यासाठी उपस्थित होते ऋतुजा राखाडे यांनी शिबिरासाठी सहाय्य केले

यावेळी रक्त चाचण्या व एक्स-रे सवलतीच्या दरात करण्यात आले या शिबिरासाठी साईनेप्स स्पाईन , दि मेडिकल हॉल - सायन, मुंबई आणि मुरबाड , श्री राम मंदिर ट्रस्ट, मुरबाड यांनी सहकार्य केले .



# खोपिवली गावात जपली जाते शेकडो वर्षाची कुस्ती सारख्या खेळाची परंपरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तालुक्यातील खोपिवली येथे गेल्या २५ वर्षांची परंपरा अखंडपणे कायम ठेवत गुरुवार १० एप्रिल २०२५ पासून १२ एप्रिल २०२५ पर्यंत हनुमान जयंतीचे औचित्य साधून अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते .खरे तर खोपिवली हे गाव मुरबाड शहरापासून जवळपास तीस किलोमीटर दुर असुन पवित्र अशा गोरख-मच्छिंद्र गडाच्या पायथ्याशी, आई डेरमातेच्या क्रुपा वरदहस्त व आशिर्वादाने पुणीत होऊन,वसलेले असून,या गावात अनेक जुन्या परंपरा, रुढी जपल्या जातात. गेल्या ग्रामीण भागातील जिवंत लोककला म्हणजे,भारूडे, नाटकांचे प्रयोग सादरीकरण करून लोककला जपली जात असुन,तर दिवाळीला या गावात रेड्याच्या होणा-या झुंजी तालुक्यात प्रसिद्ध असुन,पंचवीस वर्षांपासून या गावात अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले जाते. त्यामध्ये नामवंत अशा किर्तनकार, प्रवचनकार, भजनीबुवा यांच्या अमोघ वाणीतून ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण, प्रवचन, रात्री किर्तन, त्यांनतर जागर भजन असे भरगच्च कार्यक्रम ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आयोजित केले आहेत. आजही या गावात शेकडो वर्षांपासून कुस्ती सारख्या खेळाची परंपरा जपली जात आहे.. या मातीत अनेक पैलवान निर्माण झाले. ते केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्लीच्या तख्तावर सुद्धा त्यांनी विजय मिळवत या गावाचे नाव रोशन केले आहे.अशा प्रकारे या गावात हनुमान जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या भक्ती, शक्ती आणि कलेच्या त्रिवेणी संगमाच्या अनोख्या कार्यक्रमाचा पंचक्रोशितील भाविक भक्तांनी,कुस्तीगिरांनी लाभ घ्यावा. असे आवाहन ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# पत्रकार उत्कर्ष समितीच्या जिल्हाध्यक्षपदी मिलिंद खारपाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पत्रकार उत्कर्ष समिती रायगड जिल्हाध्यक्ष पदी आवाज महामुंबईचा या चॅनेल चे संपादक मिलिंद खारपाटील यांची निवड करण्यात आली आहे.

13 एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह पनवेल येथे रायगड जिल्ह्यातील पत्रकार परिषदेत पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी निवडपत्र दिले. मिलिंद खारपाटील हे गेल्या 36 वर्षात अनेक वृत्तपत्रात निर्भीडपणे पत्रकारितेचे काम करत आहेत.

बुलंद आवाज, किनारपट्टी, रामप्रहर, कर्नाळा ,किल्ले रायगड , पुण्यनगरी, आपले साम्राज्य, कोकण टाइम्स,उरण टाईम्स आवाज कोकणचा या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून, साप्ताहिक श्रमजीवी मध्ये सहसंपादक आणि साप्ताहिक श्रमशक्ती मध्ये त्यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले आहे. मी 24 तास, शिवसत्ता या यू ट्यूब वाहिनी मध्ये पत्रकार , महामुंबई 24 बाय 7 मध्ये संपादक म्हणून काम केले आहे. सध्या आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक आणि मालक आहेत.

त्यांच्या लेखणीतून अन्यायाला वाचा फोडण्याचे, कोकण पर्यटन साठी विशेष प्रयत्न केले आहेत. अनेक धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहून हिंदू जनजागृती साठी ते विशेष प्रयत्नशील असतात. विविध सामाजिक संघटनाचे ते पदाधिकारी असून अनेक सामाजिक उपक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे ते काम करत असतात. छत्रपती उदयनराजे भोसले सामाजिक विकास संस्थेचे ते पर्यटन विभाग प्रमुख असून प्रत्येक सहलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा किमान एक किल्ला पाहतात. रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि त्यांची शिकवण जनतेपर्यंत पोहचण्यासाठी ते सतत मग्न असतात.

पत्रकारिता आणि गड किल्ले मोहीम यासाठी त्यांचा अनेक वेळा सन्मान झाला असून त्यांच्या निवडीचे संपूर्ण रायगड जिल्ह्यात अभिनंदन करण्यात येत आहे.






# विशाल गवळीवर पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणमधील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या प्रकरणात तळोजा जेलमध्ये बंद असलेला आरोपी विशाल गवळीनं जेलच्या शौचालयात रविवारी आत्महत्या केली होती. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करून विशालचा मृतदेह तळोजा कारागृहातून मुंबईत जे. जे. रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता. शवविच्छेदन झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला मृतदेह सोपविण्यात आला, त्यानंतर त्याच्यावर रात्री उशिरा विठ्ठलवाडी स्मशानभूमीत तणावपूर्ण शांततेत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुठलाही अनुसुचित प्रकार घडु नये म्हणून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

"नराधम विशालने जे क्रुर कृत्य आमच्या दीदीसोबत केलंय, ते क्षमस्व नाही. यासाठी आम्ही कोर्टात लढा देत होतो. पण देवानेच त्याला शिक्षा दिली. याठिकाणी जशाच तसा न्याय झाला आहे. प्रशासनानेही योग्य काम केलंय. तर गवळीचे दोन्ही भाऊ तडीपार आहेत. ते कायम परिसरात दहशत निर्माण करतात. त्यांच्याकडं हत्यारे सुद्धा आहेत. फक्त त्याचे भाऊ नाही तर, त्याचे वडीलही गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत". असा गंभीर आरोप पीडित मुलीच्या वडिलांनी विशाल गवळीच्या कुटुंबावर केला आहे. तर आमच्या परिवारावर हल्ला होण्याची शक्यता आहे, अशी भीती देखील पीडित मुलीच्या वडिलांनी बोलून दाखवली. त्यामुळं हे पीडित कुटूंब भीतीच्या छायेत वावरत आहेत.

दुसरीकडं विशाल गवळीचे वकील संजय धनके यांनी बोलताना सांगितलं की, "कारागृहातील पोलिसांनी विशालला मारलं. अक्षय शिंदेसारखं विशालला मारलं आहे. त्यामुळं विशालला पोलीस सुरक्षा देण्याबाबत अर्ज देखील केला होता. त्यावर काहीही निर्णय झाला नाही. तसंच जेलमध्ये धोका असल्याचं विशालनं सांगितलं होतं".




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024